# वेकुंठीचा राणा

कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशी नरकचतुर्दशी म्हणून ओळखली जाते, तर शुक्ल पक्षातील चतुर्दशी ही वैकुंठ चतुर्दशी म्हणून ओळखली जाते. नरकचतुर्दशीला नरकाधिपती यमराजाची पूजा करतात, तर वैकुंठ चतुर्दशीला वैकुंठाधिपती श्री महाविष्णूची पूजा करतात.

वस्तुत: निर्गुण निराकार ब्रह्मतत्त्वाची सहजतेने भक्ती करता यावी म्हणूनच द्रष्ट्या ऋषीमुनींनी या ईश्वरीतत्त्वाला वैशिष्ट्यपूर्ण गुणांसहित निरनिराळ्या आकारात बद्ध केले. अशा प्रत्येक ईश्वरी प्रतीकावरील श्रद्धापूर्वक एकाग्रता ही मानवी मनाला त्या त्या गुणांचे अनुशीलन करण्याची नकळत प्रेरणा देत असते. म्हणून प्रत्येक प्रतीकातील ज्ञान समजावून घेऊन त्या प्रतीकाची षोडषोपचारे किंवा इतर विविध मार्गांनी केलेली पूजा अथवा भक्ती, ही त्या भक्तामध्ये आमूलाग्र बदल घडवू शकते. संपूर्ण विश्वाचे पालकत्व सांभाळणाऱ्या विश्वपिता महाविष्णूंच्या ईश्वरी प्रतीकामागचे ज्ञान, आज वैकुंठ चतुर्दशीच्या निमित्ताने समजावून घेणे आवश्यक आहे.

वैदिक काळापासूनच महाविष्णू ही देवता, विश्वातील एक प्रमुख देवता मानली गेली आहे. 'यज्ञो वै विष्णु:।' म्हणजे यज्ञ हाच विष्णू ही महाविष्णूची व्याख्या ऋग्वेदात (शतपथ) आढळते. पुढील पौराणिक काळात व्यक्तिगत उपासनेसाठी त्रिगुणांवर आधारित अशा तीन मुख्य देव-प्रतीकांची निर्मिती झाली व त्यांना वैश्विक कार्यानुरूप तीन मुख्य कार्यांचे अधिष्ठाता मानले गेले. रजोगुणात्मक ब्रह्मदेव विश्वनिर्मितीसाठी, सत्त्वगुणात्मक विष्णू विश्वपालनासाठी, तर तमोगुणात्मक रुद्र विश्वसंहारासाठी अशा कारणीभूत असणाऱ्या तीन प्रमुख शक्ती मानल्या गेल्या. त्यापैकी महाविष्णूरूपी पालनकर्त्या वैश्विक शक्तीचे अधिराज्य विश्वाच्या निर्मितीपासून ते विश्वाच्या लयापर्यंतच्या काळात संपूर्ण विश्वावर असते. महाराष्ट्राचे दैवत असलेला पंढरपूर क्षेत्रनिवासी पांडुरंग म्हणजे साक्षात महाविष्णूंचं भक्ताकरिता साकार झालेलं रूप आहे. संत ज्ञानेश्वर त्याला 'बापरखुमादेविवरू' म्हणजे 'रखुमाईरूपी प्रकृतीच पती असलेला तो आमचा बाप' असे संबोधतात, तर तुकाराम महाराज त्याला 'नमो विश्वरूपा विष्णुमायबापा । अपारा अमुपा पांडुरंगा ।' अशी आर्त साद घालतात.

हिंदू संस्कृतीत पालनकर्त्या महाविष्णूची दोन प्रतीके विशेष प्रसिद्ध आहेत. एक म्हणजे शंख, चक्र, पद्म आणि गदा धारण केलेले, चतुर्हस्त रूपातील प्रतीक आणि दुसरे क्षीरसागरात शेषावर शयन करणारे, पायाशी लक्ष्मी असलेले प्रतीक. ईश्वराच्या प्रत्येक प्रतीकाची निर्मिती ही आद्य ऋषीमुनींनी अभ्यासपूर्वक केलेली असल्याने या दोन्ही विष्णुप्रतीकांत सूक्ष्म अर्थ सामावलेला आहे. महाविष्णूंच्या एका हातातील चक्र हे सृष्टीच्या अविरत चाललेल्या रहाटगाडग्याचे, अखंड पुढे चाललेल्या काळाचे प्रतीक आहे, तर महाविष्णूंच्या दुसऱ्या हातातील कमळ हे सत्कर्मांच्या निर्मितीचे, उत्पत्तीचे प्रतीक आहे. ध्रुव बाळाला अढळपद देण्यापूर्वी त्याला प्रजापालनाच्या स्वकर्माची जाणीव करून देणे आवश्यक होते. याकरिता महाविष्णूंनी त्याच्या आज्ञाचक्राला पद्मस्पर्श केला व त्याला समाधीतून जागे केले असे वर्णन पुराणात आहे. थोडक्यात म्हणजे परमार्थ साधत असताना भौतिक सृष्टीमध्ये राहून आपल्या कर्मांचे यथोचित पालन करण्याची प्रेरणा महाविष्णूरूपी सत्त्वगुणात्मक वैश्विक शक्ती सातत्याने मानवाला देत असते. विश्वाच्या पालकत्वाची जबाबदारी सांभाळण्याची कुवत हीसुद्धा त्रिगुणांच्या समतोलावर तोललेली असते. केवळ एकाच गुणाच्या अस्तित्वावर पालनशक्ती कार्यरत होऊ शकत नाही. रावणाला मारताना श्रीरामाला जसा तमोगुणाचा आश्रय घ्यावा लागला असेल त्याप्रमाणे श्रीकृष्णालासुद्धा कंसाला मारताना तमोगुण वाढवावा लागलाच असेल. आत्यंतिक सत्त्वगुणसुध्दा जीवन पांगळं बनवून टाकेल. याचाच अर्थ असा की कोणताही गुण वाईट नाही. जोपर्यंत तो आपल्या मर्यादेत असतो, तोपर्यंत तो उत्तमच असतो. महाविष्णूच्या पौराणिक चरित्रात अशा सर्व गुणांचा समतोल आढळतो.

क्षीरसागर म्हणजे दुधाचा समुद्र. अशा प्रशांत समुद्रात सहस्र फणा असलेल्या नागावर बसलेला असूनसुद्धा श्रीविष्णू हा शांत व सुस्मित वदन असलेला असा असतो. याचा अर्थ असा की जीवनात सुबत्ता असो वा सहस्र जिव्हांनी गिळायला येणारी संसार दु:खे असोत, त्यापासून पळ न काढता दोन्ही स्थितीत स्थितप्रज्ञ व आनंदी असणारा हा एकप्रकारे महाविष्णूच असतो.

विष्णू म्हणजेच विशेष अणू. एखाद्या पदार्थाचे लहान लहान भाग केले, तर ज्याचे आणखी भाग पाडणे शक्य नाही, असा सूक्ष्मातिसूक्ष्म भाग म्हणजे अणू. कोणत्याही पदार्थाचे व्यापकत्व हे त्याच्या सूक्ष्मतेवर ठरते. विश्वनिर्मितीच्या संकल्पनेत उपनिषदांनी पंचमहाभूतांच्या उत्पत्तीवर विवरण केले आहे. त्यानुसार सर्वात प्रथम निर्माण झाले ते आकाशतत्त्व व पुढे क्रमाक्रमाने निर्माण झाले ते वायूतत्त्व, तेजतत्त्व, जलतत्त्व आणि पृथ्वीतत्त्व. उत्पत्तीच्या क्रमानेच त्यांच्यात स्थूलत्व येत गेलेले व परिणामत: व्यापकत्व कमी झालेले आढळते. म्हणूनच पृथ्वीतत्त्वात स्थूलतेमुळे व्यापकत्वाचा गुणधर्म कमी तर आकाशतत्त्वात सूक्ष्मतेमुळे व्यापकत्वाचा गुणधर्म जास्त आढळतो. याच न्यायाने संपूर्ण विश्वाला व्यापून शिवाय दशांगुळे उरणारा सूक्ष्मातिसूक्ष्म असा विशेष अणू, तो महाविष्णू! महाविष्णूंची वैश्विक शक्ती अतिविशाल अशा व्यापक स्वरूपाची आहे. सृष्टीतील प्रत्येत सजीव अथवा निर्जीव हा अणूंच्या संघाताच्या अधि ष्ठानावर असल्याने ते सर्व महाविष्णूंच्या अधीन राहून चलनवलन करतात, विचार करतात, कृती करतात असे म्हणणे संयुक्तिक ठरते. वस्तुत: विश्वात अशी जागाच नाही, जी विष्णूतत्त्वाने व्यापलेली नाही. महाविष्णूकडे संकुचितपणाला जागाच नाही. कुठलाही भेदाभेद न मानता सर्व सजीव - निर्जीवांना सामावून घेणारी ही विश्वव्यापी शक्ती आहे. मनुष्य जेवढ्या प्रमाणात आपल्या मनाच्या संकुचित वृत्तींचा त्याग करील व मनाला व्यापक बनवेल तेवढ्या प्रमाणात तो या विश्वव्यापी विष्णूरूपी वैश्विक शक्तीशी एकरूप होईल. श्रीविष्णूच्या पालनकर्त्या गुणांचं अनुशीलन करून निसर्गनियमांच्या आधारे सर्व प्राणिमात्रांच्या हितार्थ अविरत कार्यरत राहणारासुद्धा विष्णूरूपी वैश्विक शक्तीशी एकरूपत्व साधतो.

प्राचीन वाङ्मयामध्ये वैतरणा नदीची संकल्पना सांगितली आहे. ही नदी अतिशय किळसवाणी असून मलमांसांनी भरलेली आहे, असे तिचे वर्णन आहे. मृत्यूनंतर, जीवांना तेथे जावे लागते आणि उपभोगांमध्ये रमलेला जीव हा ती नदी पार करू शकत नाही व तिच्यात गटांगळ्या खातो व पुन: पुन्हा जन्म-मृत्यूला प्राप्त होतो, अशी ती कल्पना आहे. ही वैतरणासुद्धा जेथे कुंठीत होते, जेथे तिचा अंमल चालत नाही, ते तिच्या पैलतीरावर वसलेले 'वै'कुंठ! वय ज्याच्या मापाने मोजले जाते, तो काळसुद्धा तेथे कुंठीत होतो, म्हणूनही त्याला वैकुंठ म्हणतात. वस्तुत: वैकुंठ असा काही कुठे लोक किंवा स्थळ असतेच असे नाही. जेव्हा आपले मन विश्वातील सर्व प्राणिमात्रांना सामावून घेण्याइतपत व्यापक होते, त्यातून मत्सरादी विचार जेव्हा हद्दपार होतात तेव्हा मनाची जी आनंदमय अवस्था होते ते वैकुंठच असते. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे!' वैकुंठ चतुर्दशीच्या निमित्ताने, वैकुंठाधिपती श्रीमहाविष्णूची अशा धारणेने केलेली उपासना ही त्या भक्ताला वैकुंठाधिपतीच बनवेल.

(वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सद्‌गुरू प्रतिष्ठानच्या बदलापूर, बोरिवली, खोपोली स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत.)

- वासुदेव बापट